वसई-विरार शहर महानगरपालिका e-वार्ता
वर्ष पहिले-जून २०१५

### वसई-विरार शहर महानगरपालिकेतर्फे स्थानिक संस्था कर अभय योजना २०१५ चा लाभ घेणेकरीता व्यापारी व उद्योजक यांच्याबरोबर मेळाव्यांचे आयोजन !

व्यापा-यांकडुन विविध कारणांमुळे महापालिकेला स्थानिक संस्था कराचा भरणा न केल्यागेल्यामुळे महापालिकेचा मोठ्या प्रमाणात महसूल अडकलेला आहे. त्याकरीता प्रलंबित असलेली स्थानिक संस्था कराची रक्कम वसुल करण्याकरीता मा. राज्य शासनाने दि. ०३ जुन २०१५ पासुन स्थानिक संस्था कर अभय योजना -२०१५ जाहीर केली असुन सदर योजनेची वैशिष्टे व्यापारी वर्गापर्यंत पोहचण्याकरीता महानगरपालिकेतर्फे विविध ठिकाणी मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले. सदर योजनेचा कालावधी दि. ३१ जुलै २०१५ पर्यंतच असुन सदर योजनेची वैशिष्टे खालील प्रमाणे आहेत.

१. नोंदणीकृत व्यापा-यांनी स्थानिक संस्था कराच्या थकबाकीची मुळ रक्कम भरल्यास त्यांना व्याज व दंड माफ करण्यात येईल.

२. ज्या व्यापा-यांना एल.बी.टी. लागु आहे, परंतु अद्याप ज्यांनी आपल्या व्यवसायाची नोंदणी केलेली नाही, अशा बिगर नोंदणीकृत व्यापा-यांनी आपल्या व्यवसायाची नोंदणी करुन कराच्या थकबाकीच्या मुळ रक्कमेचा भरणा केल्यास त्यांना देखील व्याज व दंड माफ करण्यात येईल.

३. ज्या व्यापा-यांनी विवरणपत्रे दाखल केली नसतील अशा व्यापा-यांनी अभय योजनेच्या कालात विवरणपत्रे दाखल करुन देय असलेल्या संपूर्ण कराचा भरणा केला तर व्याज व दंडाची आकारणी करण्यात येणार नाही.

४. व्यापा-यांनी अभय योजना सुरु होण्यापूर्वी विवरणपत्रानुसार संपूर्ण कराचा भरणा उशिरा केला असल्यास अशा उशिरा भरलेल्या कराच्या प्रदानावर व्याज व दंडाची रक्कम आकारण्यात येणार नाही.

वरील प्रमाणे व्यापारी वर्गाकरीता शासनाने उपयुक्त अशी अभय योजना जाहीर केलेली असुन महानगरपालिका हद्दीतील व्यापा-यांना माहिती देण्याकरीता महानगरपालिकेच्या स्थानिक संस्था कर विभागामार्फत, महानगरपालिका हद्दीतील व्यापारी/उद्योजक यांच्याबरोबर संघवी हॉल, नवघर-माणिकपूर येथे दि. २४/०६/२०१५, दुपारी ३.०० वाजता व गोवालीज इंडस्ट्रीज असोसिएशन हॉल, वालिव येथे दि. २९/०६/२०१५, संध्या ४.०० वाजता मेळावे घेण्यात आले. सदर मेळाव्यांमध्ये स्थानिक संस्था कर उपआयुक्त यांनी अभय योजनेची उपस्थीत व्यापारी व उद्योजक यांना माहिती दिली. तसेच योजनेसंबधी व्यापारी उद्योजकांच्या असलेल्या शंकाचे निरसन उपआयुक्त व स्थानिक संस्था कर अधिकारी यांनी केले. अभय योजनेचा लाभ जास्तीत जास्त व्यापारी / उद्योजकांनी घेण्याबाबतचे आवाहन उपआयुक्त यांनी केले. व्यापारी व उद्योजकांना सदर योजनेची माहीती होणेकरीता महानगरपालिका हद्दीमध्ये हॅण्डबिल वाटप करणे व बॅनर (फ्लेक्स) लावणेविषयी मिळालेल्या सुचनेप्रमाणे महानगरपालिका हद्दीमध्ये हॅण्डबिलांचे वाटप करण्यात आले असुन बॅनर (फ्लेक्स) लावण्यात आलेले आहेत.




अभय योजनेच्या मेळाव्यास उपस्थित व्यापारी वर्ग

**वसई-विरार शहर महानगरपालिका**
**सार्वत्रिक निवडणूक - २०१५**

वसई-विरार शहर महानगरपालिकेची पहिली सार्वत्रिक निवडणूक २०१० मध्ये झालेली आहे, व महापालिकेची मुदत २७ जुन २०१५ रोजी संुपुष्ठात आली. वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक - २०१५ साठी २०११ च्या जनगणनेनुसार एकुण ११५ प्रभाग निश्चित करण्यात आले आहे. मा.राज्य निवडणूक आयोगाकडील दि.०८/०१/२०१५ च्या आदेशानुसार महानगरपालिकेने गुगल इमेज सह महाऑनलाईन व्दारे प्रारुप प्रभाग रचना तयार करुन आयोगाकडे मान्यतेसाठी सादर केले होते. त्यास आयोगाने दि.२३/०३/२०१५ च्या आदेशाने ११५ प्रभागासाठी मान्यता दिली. दि.३०/०३/२०१५ रोजी आरक्षण सोडतीचा कार्यक्रम पार पडला.

सार्वत्रिक निवडणूकीसाठी मतदार याद्या आयोगाच्या आदेशानुसार महाऑनलाईन व्दारे प्रभाग निहाय मतदार याद्या तयार करण्यात आल्या. सदरच्या याद्या महानगरपालिकेच्या सर्व कार्यालयात व **www.vvmc.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आल्या होत्या.

सार्वत्रिक निवडणूकीसाठी ११५ प्रभागासाठी १० निवडणूक निर्णय अधिकारी नेमण्यात आले. यासाठी प्रत्येक निवडणूक निर्णय अधिकारी यांना सरासरी ११ ते १२ प्रभाग देण्यात आले होते. सार्वत्रिक निवडणूक २०१५ साठी ११५ प्रभागामध्ये ६२७ मतदान केंद्र निश्चित करण्यात आली होती. यामध्ये ४ उमेदवार बिनविरोध निवडूण आल्याने १११ प्रभागामध्ये ३६७ उमेदवार रिंगणात होते. वसई-विरार शहर महानगरपालिकेमध्ये एकुण ७,११,२९४ इतके मतदार असून त्यापैकी स्त्री ३,२५,२११ व पुरुष ३,८६,०२३ इतके मतदार असून इतर ६० मतदार होते.

मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी प्रभागनिहाय झोनल ऑफीसर यांना मास्टर ट्रेनरमार्फत व निवडणूक निर्णय अधिकारी यांचेमार्फत EVM मशीनचे प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षित झोनल ऑफीसर मार्फत मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी क्र.१ यांना EVM मशीन हाताळणेबाबत प्रशिक्षण देण्यात आलेले होते.

आचारसंहिते करीता उपजिल्हाधिकारी दर्जाच्या अधिका-याची नियुक्ती करण्यात आली तसेच एकूण १० आचारसंहिता पथकांची पोलीस कर्मचारी यांचेसह नेमणुक करण्यात आलेली होती. तसेच रात्रीच्या पाळीसाठी स्वतंत्र आचारसंहिता पथक पोलीससह नेमण्यात आलेले होते.

निवडणूकीसाठी लागणा-या प्रचार कार्यालय, बॅनर्स व सभा इ. करीता परवानगी देण्यासाठी सर्व प्रभाग कार्यालयात विशेष कक्ष स्थापुन त्यांचेमार्फत २४ तासाच्या आत परवानगी दिली जात होती.

सार्वत्रिक निवडणूक २०१५ मध्ये जास्तीत जास्त मतदान होण्यासाठी शहराच्या मुख्य दर्शनी ठिकाणी होल्डींग, बॅनर, पथनाट्य, वर्तमान पत्रात जाहिर आवाहन तसेच स्थानिक केबल टि.व्ही वर आवाहन करण्यात आले होते. सार्वत्रिक निवडणूक - २०१५ साठी दि.१४/०६/२०१४ रोजी झालेल्या मतदानामध्ये ४७.८५% मतदान झाले. मतमोजणी दि.१६/०६/२०१५ रोजी झाली त्यामध्ये १०६ ठिकाणी बहुजन विकास आघाडी, ५ ठिकाणी शिवसेना, १ भाजप, ३ अपक्ष,याप्रमाणे सदस्य निवडून आलेले आहेत. मा.जिल्हाधिकारी ठाणे यांचे अध्यक्षते खाली दि.२९/०६/२०१५ रोजी सभा होऊन त्यामध्ये सौ.प्रविणा हितेंद्र ठाकूर ह्या महापौर म्हणून निवडून आल्या तर श्री.उमेश दत्तात्रेय नाईक हे उपमहापौर म्हणून निवडून आलेले आहेत.